UGC Approved Journal
Sr. No. 64310

ISSN 2319-8648

Indexed (IIJIF)

Impact Factor - 2.143

# Current Global Reviewer

UGC Approved International Refereed Research Journal Registered & Recognized
Higher Education For All Subjects & All Languages

Editor in Chief
Mr.Arun B. Godam

www.rjournals.co.in

Scanned with CamScanner

**CURRENT GLOBAL REVIEWER**

Half Yearly | UGC Approved | ISSN : 2319 - 8648
Issue IX Vol III , May. To Oct. 2017 | Sr. No. 64310 | Impact Factor : 2.143


| | | | |
|---|---|---|---|
| 19 | स्वातंत्र्योत्तर राजकीय कादंबरी | श्री. विभुते शिवहार प्रकाश | 67 |
| 20 | "पोवाडा या शाहिरी काव्याचे स्वरूप" | प्रा. डॉ. श्रीहरी चव्हाण | 69 |
| 21 | 'सभापती' व 'काला पहाड' कादंब-यांचा तुलनात्मक अभ्यास | श्री. परमेश्वर वाल्मिक दहिफळे | 72 |
| 22 | भारतीय प्रसार माध्यमे आणि ग्रामीण विकास | प्रा.डॉ.संतोष चंपती हंकारे | 75 |
| 23 | अहमदपूर व चाकूर तालुक्यातील ज्वारी पीक प्रारुपाचा भौगोलिक अभ्यास | प्रा.डॉ.यु.बी.सोनुले<br>प्रा.एम.एस.मुरुडकर | 78 |
| 24 | राजर्षी शाहू महाराजांचा शैक्षणिक दृष्टीकोन | शिवशंकर कसबे | 82 |
| 25 | आजच्या विज्ञानवादी युगात संशोधनाची गरज | दिनेश जारोंडे | 86 |
| 26 | सार्वजनिक आरोग्य आणि शाश्वत विकास | प्रा.डॉ.तिडके केशव दत्तराव | 89 |
| 27 | "सुशासन आणि भारतातील सुशासनाचा विकास" | हेळंबे हनमंत बालाजी | 91 |
| 28 | Public Private Partnership: Perspectives, Experiences And Civil Society Initiatives In India | प्रा. डॉ. संतराम प्रभाकर मुंडे | 94 |
| 29 | समाजातील वास्तविक समस्यावरील उपाय- आंदोलन | डॉ. व्ही. एस. इंगळे | 98 |
| 30 | मानवी हक्क : महिला | प्रा.आर.बी.काळे | 102 |
| 31 | दलित रंगभूमी समोरील आव्हाने | तायडे सिद्धार्थ आबाजी | 104 |
| 32 | गोदाकाठावरील वीरगळ : एक अभ्यास | श्री. मस्के बबन श्रीकृष्ण | 107 |
| 33 | स्थानिक स्वराज्य संस्था: मुंबई महानगरपालिका निवडणूकीतील राजकारण | मंगेश कदम | 110 |
| 34 | राजर्षी शाहू महाराज यांचे सामाजिक तत्वज्ञान | प्रा. डॉ. गणेश बालाजी बेळंबे | 114 |
| 35 | जनसंचार माध्यमों में हिंदी भाषा | प्रा.डॉ.संजय जाधव<br>आनंद देवगिरी गिरी | 116 |
| 36 | वैश्वीकरण और उपभोक्ता में हिंदी की भूमिका | प्रा. डॉ. अर्जुन पवार | 119 |




Scanned with CamScanner

## "सुशासन आणि भारतातील सुशासनाचा विकास"


हेळंबे हनमंत बालाजी
सहा.प्राध्यापक व विभाग प्रमुख
लोकप्रशासन विभाग
र.भ.अट्टल महाविद्यालय, गेवराई , जि.बीड


--------------- (27) --------------- Dept. of Public Adm. ---------------

सुशासन एक परिवर्तनकारी व युगप्रवर्तक विचार आहे. लोकशाही अधिक व्यवहारीक व समृध्द होण्यासाठी सुशासन महत्वपूर्ण आहे. सुशासन एक समकालीन, सार्वभौमिक, आदर्शात्मक व नागरिक केंद्रित संकल्पना आहे. शासन - प्रशासन नागरिक केंद्रित, समता उन्मुखी, संवेदनशिल असेल तर त्यास सुशासन म्हटले जाऊ शकते. सुशासनाद्वारे लोकप्रशासनात काही नविन तत्वांचा अवलंब करण्यात येतो. ज्यामुळे प्रशासन समाज विकासासाठी अधिक प्रभावीपणे कार्य करु शकेल. जनसहभाग, सर्वमान्यता, पारदर्शकता, उत्तरदायित्व, सेवा उन्मुखता, कायद्याचे राज्य, समावेशक सातत्यशिल विकास या तत्वांचा उल्लेख करता येईल. या तत्वांच्या माध्यमातून प्रशासन अधिक जागरुक व संवेदनशिल होऊन नागरिक केंद्रित बनते.

जागतिक बैंक, आंतरराष्ट्रीय नाणे निधी यांनी सुशासन निर्मिती विकसनशिल राष्ट्रासाठी महत्वपूर्ण मानले. जागतिक बँकेने आपल्या 'शासन व विकास' (Governance and Development) या रिपोर्ट मध्ये 1992 साली सुशासन वा चांगली शासन प्रणालीला योग्य आर्थिक धोरणांसोबत चालले पाहिजेत असे स्पष्ट केले. ज्याच्या माध्यमातून विकसनशिल राष्ट्राच्या समस्या, प्रश्न सोडवल्या जावू शकतात. थोडक्यात जागतिक बैंक, संयुक्त राष्ट्रसंघ व त्यांच्या काही विशेष एजेन्सीनींही सुशासन निर्मितीला अधिक महत्व दिले. लार्ड वेवेल म्हणतो की, जनतेच्या कल्याणासाठी प्रशासनाचे आधुनिकीकरण सुशासनाच्या माध्यमातून करावे. तसेच सुशासनासंदर्भात तीन मूलभूत तत्व सांगतले. 1) राजकीय स्थायित्व निश्चित करणे 2) पर्याप्त वित्तीय संसाधन उपलब्धी 3) प्रशासन नागरिक केंद्रीत बनवणे.

### ❖ सुशासन संकल्पना- (Good Governance Concepts)

सुशासन हा शब्द सु + शासन या दोन शब्दांपासून बनलेला असून 'सु' चा अर्थ चांगले, उत्कृष्ठ असा आहे. 'शासन' म्हणजे कार्यांचे संचलन, व्यवस्थापन होय. सुशासनाला इंग्रजीत 'Good Governance' म्हणतात. 'Good' हा शब्द 'God' शब्दापासून बनलेलला असून याचा अर्थ चांगले असा होतो. 'Governance' या संज्ञेत शासन (Government) अशासकीय संघटना (NGO), नागरी समाज (Civil Society), खाजगी क्षेत्र (Public Sector) याचा समावेश होतो.

सुशासनात कायद्याचे राज्य / शासन लागू करणे, सार्वजनिक क्षेत्रात कार्यकुशलता व जबाबदारी, भ्रष्टाचार निर्मुलन, विश्वसनिय न्यायव्यवस्था, जनतेप्रती जबाबदार प्रशासन याचा समावेश होतो.

### ❖ भारतातील सुशासनाचा विकास :

भारतामध्ये सर्वप्रथम सुशासन निर्मितीसाठी तत्कालीन पंतप्रधान राजीव गांधीजी यांच्या काळात प्रयत्न झाले. सुशासनाचे काही मूल्य अथवा सिध्दांत निश्चित करण्यात आले ते पुढील प्रमाणे आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | नैतिकता | 2. | पारदर्शकता |
| 3. | इमानदारी | 4. | कार्यतत्परता |
| 5. | चांगले चारित्र्य | 6. | संवेदनशिलता |
| 7. | निपक्ष / पक्षपात विरहीत वर्तन | 8. | प्रतिसाद |
| 9. | सकारात्मक विचार | 10. | जनसहभागाला प्राधान्य |
| 11. | प्रभावी माहिती तंत्राचा अवलंब. | | |

या मूल्यांवर राजीव गांधीजींनी सुशासन कार्यशाळेमध्ये भर दिला. त्यानंतर मार्च 1997 मध्ये उत्तरदायी प्रशासन / शासनासंदर्भात संमेलन आयोजित केले होते. त्यातही सुशासन निर्मितीवर भर दिला. पाचव्या वेतन आयोगानेही सुशासन निर्मिती बद्दल विचार व्यक्त केले. दहाव्या पंचवार्षिक योजनेपासुन प्रत्येक पंचवार्षिक योजनेत सुशासन निर्मितीच्या दृष्टीने प्रयत्न सुरु झाले. तसेच हैद्राबाद येथे राष्ट्रीय स्मार्ट शासन संस्थेची स्थापना करण्यात आली. दुसऱ्या प्रशासकीय सुधारणा आयोगानेही




Scanned with CamScanner

आपल्या अहवालात सुशासन निर्मितीच्या दृष्टीने शिफारशी केल्या आहेत. या आयोगाने आपला पहिला अहवाल जून 2006 मध्ये माहितीचा अधिकार सुशासनाची गुरुकिल्ली. 'Right to Information : Master key of Good governance' असा सादर केला.

❖ **भारतात सुशासन निर्मीतीच्या दृष्टीने केलेल्या सुधारणा :**

भारत सरकारने सुशासनाचे जे तत्व किंवा वैशिष्ट्य आहे ते साध्य करण्याच्या दृष्टीने, शासन व्यवस्थेची गुणवत्ता सुधारण्यासाठी केलेल्या सुधारणा-

**1. माहिती अधिकार, कायद्याची अंमलबजावणी :**

शासन- प्रशासन व्यवस्थेत पारदर्शकता निर्माण व्हावी व जनतेला माहिती उपलब्ध व्हावी या उद्देशाने 2005 मध्ये माहिती अधिकार कायदा संपूर्ण भारतात लागू करण्यात आला. प्रशासनाने जबाबदारी, उत्तरदायीत्वाच्या भावनेतून कार्य करावे, माहितीचे पारदर्शक आदान-प्रदान, लोकसहभागाला महत्व, लोकशाही सबलीकरण, शासनाच्या योजनात विकास कार्यक्रम केंद्र फाईल्स मध्येच न राहता त्याची पूर्ण माहिती जनतेला व्हावी, पारदर्शकता शासन व्यवस्था निर्माण करण्याच्या दृष्टीने माहितीचा अधिकार कायद्याची तात्काळ प्रभावीपणे अंमलबजावणी सुरु झाली.

**2. प्रशासकीय सुधारणा :**

शासनास अधिक कार्यतत्पर, जबाबदार, उत्तरदायी, प्रभावी व उत्कृष्ठ प्रशासन निर्मितीसाठी विविध समित्या, आयोग स्थापन करण्यात आले. त्यात दुसरा प्रशासकीय सुधारणा आयोग महत्वपूर्ण आहे. आयोगाने मानव संसाधन, प्रशासकीय नैतिकता, माहिती अधिकार, सार्वजनिक वित्त व्यवस्था, आपत्ती व्यवस्थापन, नागरिककेंद्री प्रशासन अशा अनेक क्षेत्रात सुधारणा घडवून आणण्यासाठी ज्या शिफारसी केल्या त्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे. प्रसंगी जुने कायदे व नियमातही सुधारणा करुन त्याची अंमलबजावणी केली जात आहे.

**3. न्यायालयीन सक्रियता :**

सार्वजनिक हिताचे महत्वपूर्ण विषयासंबंधी सर्वोच्च न्यायालय आपले मत सरकार समोर मांडते अथवा त्यासंदर्भात कार्यवाही करण्याचे आदेश देते. तसेच जनहित याचिकांवर सुनावणी करुन सरकारचे त्याकडे लक्ष वेधून घेते यातून न्यायीक सक्रियता पहावयास मिळते.

**4. स्थानिक स्वशासन व महिला सहभागाला प्राधान्य :**

लोकशाही विकेंद्रीकरण, स्थानिक स्वराज्य संस्था अधिक सक्षम व्हाव्यात, त्यांना घटनात्मक दर्जा प्राप्त व्हावा, समाजातील सर्व नागरीकांना सहभागाची संधी मिळावी या उद्देशाने 73 व 74 वी घटनादुरुस्ती करण्यात येवून त्यांना कार्य करण्यासाठी अधिकार बहाल केले. तसेच महिलांना 33% आरक्षण दिले पण ते 2009 मध्ये 110 व्या घटनादुरुस्तीने 50% करण्यात आले. शहरी व ग्रामीण स्थानिक स्वशासन संस्था मध्ये महिला सहभागाला अधिक प्राधान्य देण्यात आले. त्यामुळे त्या विकास कार्यक्रम, ध्येय धोरणे आखणी, अंमलबजावणी व मुल्यांकनात उत्स्फूर्तपणे सहभागी होतात तसेच पारदर्शक व्यवहाराला प्राधान्य देताना दिसून येतात.

**5. निर्वाचन प्रणालित सुधारणा :**

निर्वाचन आयोगाने 1990 नंतर निवडणूक पध्दती / प्रणाली मध्ये अमुलाग्र बदल केल्याचे पहावयास मिळते. निर्वाचन आयोगाने अनेक नियम बनवले, असून त्या माध्यमातून भ्रष्ट, बाहुबली लोकांवर नियंत्रण ठेवण्यात येते. एखाद्या प्रकरणात तुरुंगवासाची शिक्षा असेल तर निवडणूक लढण्यास अपात्र ठरवले जाते, मतदान प्रणालीत सुधारणा, तिसरे अपत्य असणाऱ्यांना स्थानिक स्वशासन निवडणुका लढवण्यास प्रतिबंध इ.

**6. कायदा व सुव्यवस्था :**

कायदे व नियमांच्या माध्यमातून सुव्यवस्था निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात येतो. यात कायद्याचे राज्य संकल्पनेत प्राधान्य, सर्वांची सुरक्षा, नागरी सर्वोच्च सत्तेला महत्व देण्यात येते. कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्याच्या दृष्टीने पोलीसांना मानवी हक्काबद्दल प्रशिक्षण देणे, दंगल विरोधी पथके, दहशतवाद प्रतिबंध पथक, पोलीस मित्र यांच्या माध्यमातून सुव्यवस्था सांभाळली जाते व सुशासन निर्मितीला चालना देण्यात येते.



Scanned with CamScanner

**7. नियोजित विकास कार्यक्रम :**

केंद्र अथवा राज्य सरकार मार्फत विकास कार्यक्रम राबवताना नियोजनबध्द तयार करून राबवले जातात. नियोजन बध्द विकास कार्यक्रमांमुळे विकासाचे ध्येय निश्चित कालावधीमध्ये साध्य करता येतात. नियोजनामध्ये कार्यक्रम आखणी अंमलबजावणीमध्ये PPP, BOT या सारख्या तत्वांचाही अवलंब केला जातो. विकास कार्यक्रमांचे नियोजनामुळे त्यासाठी लागणारे भांडवल, मनुष्यबळ कालावधी याचा अंदाज येतो. व निर्धारित उद्दिष्ठ साध्य होतात.

**8. आपत्ती व्यवस्थापनाला प्राधान्य :**

नैसर्गिक तसेच मानवनिर्मित आपत्ती वेळी पूर्वी प्रतिसाद व पुनर्वसन कार्याला महत्व दिले. परंतु आपत्तीमुळे होणारी जीवित व वित्तहानी टाळावी यासाठी सुशासनांतर्गत प्रतिबंध, प्रतिसाद, आपत्तीपूर्व सूचना प्रणाली, पुनर्बांधणी, यांना अधिक महत्व देण्यात येवू लागले. तसेच भारत सरकारने राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन कायदा- 2005 मध्ये करून प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यास सुरूवात केली. त्याअंतर्गत राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन संस्था, प्रशिक्षण संस्था, राज्यस्तरावर आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण स्थापन केले. जिल्हा, तालुका ते गाव पातळीपर्यंत आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा निर्माण केली त्याच्या माध्यमातून विविध विभागांच्या सहकार्याने आपत्ती व्यवस्थापनास प्राधान्य देवून होणारी जीवित व वित्तहानी टाळण्याचा प्रयत्न केला जात आहे.

**9. नागरी सेवा हक्क कायदा :**

हा कायदा सार्वजनिक सेवा हक्क कायदा म्हणूनही ओळखला जातो. केंद्र-राज्य सरकारमार्फत पुरवण्यात येणाऱ्या सेवांची माहिती, त्याचा कालावधी, शुल्क, नागरिकांना कोणत्या विभागाकडून कोणत्या प्रकारच्या सेवा पुरवल्या जातात याची सविस्तर माहिती दिली जाते. त्यानुसार नागरिक त्या सेवांचा लाभ होतात.

थोडक्यात शासन कार्यतत्पर, पारदर्शक प्रभावी बनवणे, नागरिक सनद प्रसिध्दी व अंमलबजावणी, मानवी हक्क रक्षण, कायदा व सुव्यवस्थेला प्राधान्य, नागरिकांना उत्कृष्ठ सेवा पुरवून शांतताप्रिय समाज निर्मीतीसाठी सुशासनाच्या माध्यमातून प्रयत्न होताना दिसून येतात.

---------------संदर्भ सुची :--------------------

1. Mohit Bhattacharya, New Horizons of Public Administration, Jawar Publisher, New Delhi-2010
2. डॉ.बी.एल. फडीया, लोकप्रशासन- साहित्यभुवन पब्लीकेशन आग्रा- 2013.
3. अशोक दुबे, 21 वी शताब्दी में लोकप्रशासन, टाटा मॅकग्राहिल पब्लीकेशन कंपनी नयी दिल्ली 2008.
4. सुनिल गुप्ता व डॉ.कमल कुमार सिंग, सुशासन, NBT New Delhi, 2011.
5. सुरेंद्र मुन्शी / सोमा चौधरी, सुशासन, रावत पब्लीकेशन जयपूर- 2011.



Scanned with CamScanner